**नाशिक जिल्हा परिषद नाशिक सामान्य प्रशासन विभाग, दुरध्वनी क्रमांक ०२५३-२५९१०१०**

**जाक्र/साप्रवि/आस्था-३ /१५१७/२०१७**
**नाशिक दिनांक:- ०३/०७/२०१७**

**प्रति,**

**१) खाते प्रमुख ---------------(सर्व)**
**जिल्हा परिषद, नाशिक**

**विषय :- आस्थापना विषयक नस्तीवर कार्यवाही करतांना सहा.प्रशासन अधिकारी, कनि. प्रशासन अधिकारी यांनी घ्यावयाच्या दक्षते बाबत.**

उपरोक्त विषयानुसार आपणास सुचित करण्यात येत आहे. आपले विभागाकडुन आस्थापना विषयक महत्वाचे निर्णय, नियुक्ती आदेश, पदोन्नती आदेश, शिक्षेचे आदेश, सेवा समाप्तीचे आदेश, परिविक्षाधीन कालावधी संपुष्टात आणणे, स्थायीत्व प्रमाणपत्र आदेश, सेवा प्रवेशोत्तर परिक्षा सुट, इत्यादी स्वरूपाचे आदेश नस्तीवर मान्यता मिळाल्यानंतर निर्गमित केले जातात.

वरील स्वरूपाचे आदेश निर्गमित केलेनंतर आदेशाची एक प्रत मध्यवर्ती माहिती तंत्र  ज्ञान कक्ष (आयटी सेल) यांचे कडेस आदेशामध्ये नमुद करण्यात यावे तसेच एक प्रत स्विय सहाय्यक मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांचेकडेस अग्रेषित करण्यात यावी. या बाबत संबंधीत विभागाचे सहा.प्रशासन अधिकारी, कनि.प्रशासन अधिकारी यांनी विशेष लक्ष देवुन कार्यवाही करावी. भविष्यात अशा निर्णयाच्या प्रती अग्रेषित न झाल्याचा प्रकार निदर्शनास आल्यास संबंधीत विभागाचे सहा.प्रशासन अधिकारी व कनि.प्रशासन अधिकारी यांना व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

Deepak
3/07

**(दीपक कुमार मीना)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,नाशिक**

Scanned by CamScanner